# प्रेसनोट दि. ०६/०१/२०१८

## बेकायदा रिव्हॉल्वर बाळगणारा विश्रामबाग पोलीसांकडून अटक

आरोपी नामे संदीप अनंता रेणुसे वय ३१ वर्षे रा. स. नं. २८/१५ नरवीर तानाजी वाडी, धनकवडी, पुणे हा दि. ०५/०१/२०१८ रोजी १७.३० वा. गुप्ता वाईनशॉप जवळ, नारायण पेठ, पणे येथे अग्निशस्त्रासह येणार आहे. अशी खबर विश्रामबाग पोलीस ठाणेचे पोलीस शिपाई सुधीर भिलारे यांना मिळाली होती. त्याप्रमाणे वरील आरोपीस एक देशी बनावटीचे रिव्हॉल्वर व दोन काडतुस बेकायदेशीर हत्यार जवळ बाळगले असताना मिळून आल्याने त्यास अटक करून त्याचे विरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ३/२०१८ आर्म अॅक्ट कलम ३, २५ व मुंबई पोलीस अॅक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे दि. ०५/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक आरोपीकडून ०१ देशी बनावटीचे रिव्हॉल्वर, दोन काडतुस, रोख रक्कम असे सर्व मिळून एकुण १०,४५०/- रू चा माल मिळून आला.

वरील कामगिरी परिमंडळ १ चे पोलीस उप-आयुक्त बसवराज तेली, सहा. पोलीस आयुक्त शरद उगले यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अप्पासाहेब शेवाळे, पोलीस निरीक्षक गुन्हे अमृत मराठे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई सुधिर भिलारे, धीरज पवार, संजय बनसोडे, चेतन शिरोळकर यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याकडिल पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे करीत आहेत.